॥ श्री नवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 1 --- PRATHAMODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

As the Dwapara Yuga ends, Uddhava asks Lord Krishna how humans will survive the hardships and false prophets of the upcoming Kali Yuga. In response, Krishna summons the Navanarayanas (nine celestial sages) and commands them to incarnate on Earth to protect dharma. Sage Kavi is chosen to descend first as the master Machchindranath. The incarnation begins when divine energy falls into the Kshirodaka Ocean and is swallowed by a fish. Nearby on the seashore, Lord Shiva is secretly teaching the ultimate knowledge of reality to Goddess Parvati. While Parvati drifts off to sleep, the unborn child inside the fish listens intently and responds aloud, earning Shiva's highest blessings. The fish later deposits an egg on the riverbank, and a fisherman named Kamik finds the newborn boy, naming him Machchindra. Driven by natural compassion, the young child routinely frees the captured fish back into the water, sparking his father's anger over their lost livelihood. Choosing renunciation over worldly life, the five-year-old child leaves his family behind and travels north to Badrinath to begin intense, lifelong austerities.

Ovee 1

ॐ नमो जी हेरंबमूर्ती । वक्रतुंडा गणाधिपती । विद्यार्णवा कळासंपत्ती । भक्तसंकट वारीं गजानन ॥ १ ॥

Transliteration

Om namo jee Heramba-moortee | Vakratundaa Gana-Adhipatee | Vidyaa-arnavaa kalaa-sampattee | Bhakta-sankata vaaree Gajaanana ||

Ovee 2

सदैव धवला श्वेतपद्मा । विद्याभूषित कलासंपन्नधामा । तुझ्या वंदितों पादपद्मा । ग्रंथाक्षरां बोलवीं ॥ २ ॥

Transliteration

Sadaiva dhavalaa shveta-padmaa | Vidyaa-bhooshita kalaa-sampanna-dhaamaa | Tujhyaa vandito paada-padmaa | Granthaa-aksharaa bolavee ||

Ovee 3

तूं निव्वळ निरंजन निर्विकार । परी भक्ततरज्जुबंधनाधार । प्रेमें संभवोनि मूर्ति साकार । आम्हां दासां मिरविसी ॥ ३ ॥

Transliteration

Too nischvala Niranjana nirvikaaru | Paree bhakta-rajju bandhanaa dhaaru | Preme sambhavoni moorti saakaaru | Aamhaa daasaa miravisee ||

Ovee 4

तरी वक्रतुंडा पाशांकुशधरा । किंकिणीमंडिता ग्रंथादरा । येऊनि स्वामी वदनसुंदरा । मम रसनारस सेवीं कां ॥ ४ ॥

Transliteration

Taree Vakratundaa paashaan kusha dharaa | Kinkinee-manditaa granthaa-aadaraa | Yeuuni Svaamee vadana-sundaraa | Mama rasanaa rasa sevee kaa ||

Ovee 5

अगा अर्थ-लिंग-प्रकरण-ऱ्हस्व- । दीर्घ श्रृंगार धारणा सुरस । छंद ताल नवरस । ग्रंथामाजी आदरीं कां ॥ ५ ॥

Transliteration

Agaa artha-linga-prakarana-rhasva | Deergha shringaara dhaaranaa surasu | Chanda taala navarasu | Granthaa-maajee aadaree kaa ||

Ovee 6

हे गणाधिपते गणराज । मी अबुध वर्णना आहे सहज । परी कृपा करोनि सकळां भोज । विकळ आपदा हरी आतां ॥ ६ ॥

Transliteration

Hey Ganadhipate Ganaraaju | Mee abudha varnanaa aahe sahaju | Paree kripaa karoni sakalaa bhoju | Vikala aapadaa Haree aataa ||

Ovee 7

हे मोरेश्वरा गणाधिपति । सर्वविषयाधीशमूर्ती । मंगळारंभी मंगळाकृती । आरंभी स्तुती प्रार्थितों ॥ ७ ॥

Transliteration

Hey Moreshvaraa Ganadhipati | Sarva-vishaya-adheesha-moortee | Mangala-aarambhee mangala-aakritee | Aarambhee stutee praarthito ||

Ovee 8

तरी सरस्वती कळामांदुस । सवे घेऊनि वाहनहंस । या संतांगणीं येऊनि सभेस । विराजावें महाराजा ॥ ८ ॥

Transliteration

Taree Sarasvatee kalaa-maandusu | Save gheuuni vaahana-hansu | Yaa santa anganee yeuuni sabhesu | Viraajaave Mahaaraajaa ||

Ovee 9

जी मंगलदायक वाग्भवानी । चातुर्यसरिता ब्रह्मनंदिनी । ती महाशक्ती हंसवाहिनी । घेऊनि घेई महाराजा ॥ ९ ॥

Transliteration

Jee mangala-daayaka Vaagbhavaanee | Chaaturya-saritaa Brahma Nandinee | Tee mahaa shaktee hansa-vaahinee | Gheuuni gheee Mahaaraajaa ||

Ovee 10

जीचेनि कृपें वांकुडें दृष्टी । वाचस्पतीच्या मिरवती कोटी । ती माय तूं सवें गोरटी । घेऊनि येई महाराजा ॥ १० ॥

Transliteration

Jeecheni kripe vaankude drishtee | Vaachaspateechyaa miravatee kotee | Tee Maaya too save goratee | Gheuuni yeee Mahaaraajaa ||

Ovee 11

असो ऐसें पाचारणवचन । ग्लानित भावना सम्यक् पाहून । ग्रंथासनीं मूर्तिमंत येऊन । वरालागीं ओपिजे ॥ ११ ॥

Transliteration

Aso aise paachaarana-vachanu | Glaanita bhaavanaa samyaku paahuunu | Granthaa-aasanee moortimanta yeuunu | Varaa laagee opije ||

Ovee 12

सकळसिद्धि पूर्णपणा । पावोत ऐशा विनीतवचना । वरद मौळी हस्तकंजना । स्पर्शोनि ज्ञान मिरविलें ॥ १२ ॥

Transliteration

Sakala siddhi poorna panaa | Paavota aishaa vineeta-vachanaa | Varada-maulee hasta-kanjanaa | Sparshonni jnyaana miravile ||

Ovee 13

म्हणे महाराजा कलोत्तमा । सिद्धी पावेल काव्यमहिमा । ऐसें बोलोनि सुशीलधामा । रसने स्थापिली सरस्वती ॥ १३ ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa kalottamaa | Siddhee paavela kaavya-mahimaa | Aise boloni susheela-dhaamaa | Rasane sthaapilee Sarasvatee ||

Ovee 14

यापरी नमितों श्रीगुरुराज । जो अज्ञानतमीं सविता विराजे । जो मोक्षपदातें वरवूनि काज । साधकातें विराजवी ॥ १४ ॥

Transliteration

Yaaparee namito Shreeguru raaju | Jo ajnyaana tamee Savitaa viraaje | Jo moksha-padaate varavuuni kaaju | Saadhakaate viraajavee ||

Ovee 15

तो ज्ञानेश गुरु ज्ञानदिवटी । संजोगोनि बैसला मम पृष्ठीं । लेखणी कवळोनि करसंपुटीं । ग्रंथालागीं आदरीतसे ॥ १५ ॥

Transliteration

Toh Jnyaanesha Guru jnyaana divatee | Sanjogoni baisalaa mama prishthee |
Lekhanee kavaloni kara-samputee | Granthaa laagee aadareetase ||

Ovee 16

वरदहस्तें स्पर्शोनि मौळी । फेडिली सकळ अज्ञानकाजळी । यापरी तया बद्धांजुळीं । अनन्यभावें नमितों मी ॥ १६ ॥

Transliteration

Varada haste sparshoni maulee | Phedilee sakala ajnyaana-kaajalee | Yaaparee tayaa baddhanjulee | Ananya-bhaave namito mee ||

Ovee 17

जो नरहरिवंशीं विजयध्वज । धुंडिराज नाम तयाचें साजे । तोही पृष्ठीं बैसोनि सहज । ग्रंथालागीं आदरीतसे ॥ १७ ॥

Transliteration

Jo Narahari vamshee vijaya-dhvaju | Dhundiraaja naama tayaache saaje | Tohee prishthee baisoni sahaju | Granthaa laagee aadareetase ||

Ovee 18

आतां नमूं ज्ञानशक्ती । जी सत्तामयी चिद्भगवती । अनन्यभावें चरणांवरती । भाळ तिचिये अर्पोनियां ॥ १८ ॥

Transliteration

Aataa namoo jnyaana shaktee | Jee sattaa mayee Chit-bhagavatee | Ananya-bhaave charanaa varatee | Bhaala tichiye arponiyaa ||

Ovee 19

यापरी नमिती श्रोते संत । कीं तुमच्या गृहींचा मी अतीत । तरी ग्रंथांतरीं सुरस नितांत । प्रेमभरित दाटवा ॥ १९ ॥

Transliteration

Yaaparee namitho shrote santu | Kee tumachyaa griheenchaa mee ateetu | Taree grantha antaree surasa nitaantu | Prema bharita daatavaa ||

Ovee 20

अहो प्राज्ञिक संत श्रोतीं । प्रत्यक्ष तुम्ही महेशमूर्ती । तुम्हां वर्णावया अबुध शक्ती । मजमाजी केवीं मिरवेल ॥ २० ॥

Transliteration

Aho praajnyika santa shrotee | Pratyaksha tumhee Mahesha-Moortee | Tumhaa varnaavayaa abudha shaktee | Maja maajee kevee miravelu ||

Ovee 21

परी धन्य तुम्ही भक्तिवाडें । स्वीकारितां बोल बोबडे । जड बाळा उभवोनि कोडें । जगामाजी मिरवितां ॥ २१ ॥

Transliteration

Paree dhanya tumhee bhaktivaade | Sveekaaritaa bola bobade | Jada baalaa ubhavoni kode | Jagaa-maajee miravitaa ||

Ovee 22

कीं पहा जैसें कांचमण्यास । सोमकांत नांव ठेविलें त्यास । तेणेंचि शब्दें लाज सोमास । वरवूनि बुंदां ढाळीतसे ॥ २२ ॥

Transliteration

Kee pahaa jaise kaancha-manyaasu | Somakaanta naava thevile tyaasu | Tenonchi shabde laaja Somaasu | Varavuuni bundaa dhaaleetase ||

Ovee 23

तेवीं तुमचा शरणागत । नरहरि मालू धुंडीसुत । तस्मात् महंत श्रोते संत । करा सरतें आपणांतरी ॥ २३ ॥

Transliteration

Tevee tumachaa sharana-aagatu | Narahari Maaloo Dhundee-Sutu | Tasmaatu mahanta shrote santu | Karaa sarate aapana antaree ||

Ovee 24

यापरी पूर्वी कथासारामृत ग्रंथ । वदविला तुम्हीं श्रद्धायुक्त । आतांही ओपूनि वरद हस्त । भक्तिसार वदवा हा ॥ २४ ॥

Transliteration

Yaaparee poorvee Kathaa-Saara-Amrita granthu | Vadavilaa tumhee shraddhaa-yuktu | Aataanhee opuuni varada hastu | Bhakti Saara vadavaa haa ||

Ovee 25

जे संत झाले जगद्विख्यात । तयांचें माहात्म्य वदविलें समस्त । परी सारासार कथा त्यांत । उरल्या असती महाराज ॥ २५ ॥

Transliteration

Je santa jhaale jagat-vikhyaatu | Tayaanche maahaatmya vadavile samastu | Paree saaraa saara kathaa tyaantu | Uralyaa asatee Mahaaraaja ||

Ovee 26

जया संतांच्यापायीं रत । गुरुमूर्ती प्रतापवंत । की ज्यांनी सांप्रदाय जगद्विख्यात । जगामाजी स्थापिले ॥ २६ ॥

Transliteration

Jayaa santaanchyaa-paayee ratu | Guru moortee prataapa-vantu | Kee jyaannee saampradaaya jagat-vikhyaatu | Jagaa-maajee sthaapile ||

Ovee 27

तरी त्यांची सर्व कथा ग्रंथी । स्वीकारावया अवधान द्यावें श्रोतीं । असो कलिप्रारंभीं रमापती । नवनारायणा पाचारी ॥ २७ ॥

Transliteration

Taree tyaanchee sarva kathaa granthee | Sveekaaraavayaa avadhaana dyaave shrotee | Aso kali-praarambhee Ramaapatee | Nava-Naaraayanaa paachaaree ||

Ovee 28

उद्धवासी बैसवोनि सन्निध । कनकासनीं यादववृंद । तव ते नवनारायण प्रसिद्ध । प्रविष्ट झाले द्वारके ॥ २८ ॥

Transliteration

Uddhavaasee baisavoni sannidhu | Kanaka-aasanee Yadavavrindu | Tava tey Nava Naaraayana prasiddhu | Pravishta jhaale Dvaarake ||

Ovee 29

कवि प्रथम हरि दुसरा । अंतरिक्ष तृतीय होय चतुर । महाप्राज्ञिक प्रबुद्ध नर । नारायण चतुर्थ तो ॥ २९ ॥

Transliteration

Kavi prathama Hari dusaraa | Antariksha triteeya hoya chaturu | Mahaa praajnyika Prabuddha naru | Naaraayana chaturtha toh ||

Ovee 30

पंचम महाराज पिप्पलायन । सहावा आविर्होत्र नारायण । सातवा द्रुमिल आठवा चमस जाण । करभाजन नववा तो ॥ ३० ॥

Transliteration

Panchama Mahaaraaja Pippalaayanu | Sahaavaa Aavirhotra Naaraayanu | Saatavaa Drumila aathavaa Chamasa jaanu | Karabhaajana navavaa toh ||

Ovee 31

ऐसे नवनारायण महाराज । द्वारकेंत पातले सहजासहज । रमापतीचें पाचारणचोज । दृश्य झाले धवळारी ॥ ३१ ॥

Transliteration

Aise Nava Naaraayana Mahaaraaju | Dvaaraketa paatale sahajaa-sahaju | Ramaapatee che paachaarana-choju | Drishya jhaale dhavalaaree ||

Ovee 32

हरीनें पाहतांचि नारायण । सोडिता जाहला सिंहासन । परम गौरविले आलिंगून । कनकासनीं बैसविले ॥ ३२ ॥

Transliteration

Hareene paahataanchi Naaraayanu | Soditaa jaahalaa sinhaasanu | Parama gauravile aalinguunu | Kanaka-aasanee baisavile ||

Ovee 33

सकलवैभवभूषणाकार । मेळवोनि सकळ अर्चासंभार । सारिता झाला सपरिकर । षोडशोपचारें पूजेसी ॥ ३३ ॥

Transliteration

Sakala-vaibhava-bhooshanaa-kaaru | Melavoni sakala archaa-sambhaaru | Saaritaa jhaalaa saparikaru | Shodasha-upachaare poojesee ||

Ovee 34

हरिचा गौरव पाहोन । बोलते झाले नारायण । कवण अर्थी पाचारण । आम्हांसी केलें श्रीरंगा ॥ ३४ ॥

Transliteration

Harichaa gaurava paahonu | Bolate jhaale Naaraayanu | Kavana arthee paachaaranu | Aamhaansee kele Shree Rangaa ||

Ovee 35

हरि म्हणे जो महाराजा । कीं मनीं काम वेधला माझ्या । कलींत अवतार घेणें ओजा । तुम्हीं आम्हीं चलावें ॥ ३५ ॥

Transliteration

Hari mhane jo Mahaaraajaa | Kee manee kaama vedhalaa maajhyaa | Kaleeta avataara ghene ojaa | Tumhee aamhee chalaave ||

Ovee 36

जैसे समुच्चये एकमेळीं । राजहंस जाती उदधिजळीं । तेवीं तुम्हीं कृपाकल्लोळीं । अवतारदीक्षा मिरवावी ॥ ३६ ॥

Transliteration

Jaise samruchchaye ekamelee | Raajahansa jaatee udadhijalee | Tevee tumhee kripaa-kallolee | Avataara deekshaa miravaavee ||

Ovee 37

येरु म्हणती जनार्दना । अवतार घ्यावा कवणे स्थाना । कवण नामीं कवण लक्षणां । जगामाजी मिरवावें ॥ ३७ ॥

Transliteration

Yeru mhanatee Janaardanaa | Avataara ghyaavaa kavane sthaanaa | Kavana naamee kavana lakshanaa | Jagaa-maajee miravaave ||

Ovee 38

यावरी बोले द्वारकाधीश । कवि नारायण जो कां प्रत्यक्ष । तेणें मच्छिंद्र होऊनि दक्ष । जगामाजी मिरवावें ॥ ३८ ॥

Transliteration

Yaavaree bole Dvaarakaa-Adheeshu | Kavi Naaraayana jo kaa pratyakshu | Tene Machchindra houuni dakshu | Jagaa-maajee miravaave ||

Ovee 39

यावरी हरी जो महादक्ष । तो तंव शिष्य होऊनी प्रत्यक्ष । महाराज नामें तो गोरक्ष । जगामाजी मिरविजे ॥ ३९ ॥

Transliteration

Yaavaree Haree jo mahaa dakshu | Toh tava shishya houunee pratyakshu | Mahaaraaja naame toh Gorakshu | Jagaa-maajee miravije ||

Ovee 40

यापरी अंतरिक्ष नारायण नाम । तो जालिंदर मिरविजे प्रकाम । तयाचा शिष्य भक्तिद्रुम । प्रबुद्ध नामे कानिफा ॥ ४० ॥

Transliteration

Yaaparee Antariksha Naaraayana naamu | Toh Jaalindara miravije prakaamu | Tayaachaa shishya bhakti drumu | Prabuddha naame Kaaniphaa ||

Ovee 41

यापरी पंचम पिप्पलायन प्रकाम । मिरविजे जगीं चरपट नाम । आविर्होत्र जो योगद्रुम । मिरविजे जगीं नामें नागेश ॥ ४१ ॥

Transliteration

Yaaparee panchama Pippalaayana prakaamu | Miravije jagee Charapata naamu | Aavirhotra jo yoga-drumu | Miravije jagee naame Naagesha ||

Ovee 42

यापरी द्रुमिल अतिसमर्थ । जगीं मिरविजे भरतनाथ । आणि चमस नारायण जगीं विख्यात । रेवणनामें मिरविजे ॥ ४२ ॥

Transliteration

Yaaparee Drumila ati-samarthu | Jagee miravije Bharata Naathu | Aani Chamasa Naaraayana jagee vikhyaatu | Revana naame miravije ||

Ovee 43

नववा तो करभाजन । तो गहिनी ऐसें मिरविजे नाम । ऐसे अवतार महीकारण । दीक्षेप्रति मिरवावे ॥ ४३ ॥

Transliteration

Navavaa toh Karabhaajanu | Toh Gahinee aise miravije naamu | Aise avataara mahee kaaranu | Deekshe-prati miravaave ||

Ovee 44

म्हणाल एकटपणीं वास । करणें सांगतां आम्हीं कलीस । तरी तुम्हांसवें अवतारास । बहुत येतील महाराजा ॥ ४४ ॥

Transliteration

Mhanaala ekata panee vaasu | Karane saangataa aamhee Kaleesu | Taree tumhaan save avataaraasu | Bahuta yeteela Mahaaraajaa ||

Ovee 45

प्रत्यक्ष कवि वाल्मीक सुरस । तो पुढे होईल तुलसीदास । आणि शुक्र महाराज जो ब्रह्मभास । कबीर भक्त होईल तो ॥ ४५ ॥

Transliteration

Pratyaksha kavi Vaalmeeka surasu | Toh pudhe hoeela Tulasee-daasu | Aani Shukra Mahaaraaja jo Brahma-bhaasu | Kabeera bhakta hoeela toh ||

Ovee 46

यापरी जो व्यास मुनी । तो जयदेव होईल महाप्राज्ञी । आणि उद्धव माझा प्राणाहुनी । आवडता होईल नामा तो ॥ ४६ ॥

Transliteration

Yaaparee jo Vyaasa munee | Toh Jayadeva hoeela mahaa-praajnyee | Aani Uddhava maajhaa praanaa-hunee | Aavadataa hoeela Naamaa toh ||

Ovee 47

आणि भक्तिप्रौढी जांबुवंत । तो नरहरि होईल नितांत । प्रत्यक्ष जो बलराम भ्रात । पुंडलीक होईल तो ॥ ४७ ॥

Transliteration

Aani bhakti praudhee Jaambu-vantu | Toh Narahari hoeela nitaantu | Pratyaksha jo Balaraama bhraatu | Pundaleeka hoeela toh ||

Ovee 48

मीही प्रत्यक्ष जन्मोन । ज्ञानदेव नामें मिरवीन । आणि धवलारी जो पंचानन । निवृत्तिनाथ होईल कीं ॥ ४८ ॥

Transliteration

Meehee pratyaksha janmonu | Jnyaana Deva naame miraveenu | Aani dhavalaaree jo Panchaananu | Nivritti-Naatha hoeela kee ||

Ovee 49

आणि सत्यनाथ चतुरानन । तो स्वनामीं मिरवील सोपान । जी योगमाया मानसमोहन । मुक्ताबाई विराजेल ॥ ४९ ॥

Transliteration

Aani Satya Naatha Chaturaananu | Toh svanaamee miraveela Sopaanu | Jee Yoga Maayaa maanasa-mohanu | Muktaabaaee viraajela ||

Ovee 50

यापरी प्राज्ञिक हनुमंत । तो रामदास होईल महाभक्त । आणि कुब्जा दासी मातें रमत । जनी जनांत होईल कीं ॥ ५० ॥

Transliteration

Yaaparee praajnyika Hanumantu | Toh Raamadaasa hoeela mahaa bhaktu | Aani Kubjaa daasee maate ramatu | Janee Janaanta hoeela kee ||

Ovee 51

असो ऐसें समुच्चयेंकरोन । कलींत वाढवावें भक्तिमाहात्म्य जाण । मग अवश्य म्हणोनि नारायण । पुढें बोलत प्रश्नातें ॥ ५१ ॥

Transliteration

Aso aise samuchchaye karonu | Kaleeta vaadha-vaave bhakti maahaatmya jaanu | Maga avashya mhanoni Naaraayanu | Pudhe bolata prashnaate ||

Ovee 52

म्हणती महाराजा सर्वज्ञमूर्ती । आम्हां सांगतां जन्मस्थिती । परी कवण स्थानीं केउते युक्तीं । व्यक्त होणें तें सांगा ॥ ५२ ॥

Transliteration

Mhanatee Mahaaraajaa Sarvagnya Moortee | Aamhaa saangataa janma sthitee | Paree kavana sthaanee keute yuktee | Vyakta hone tey saangaa ||

Ovee 53

यावरी बोले प्रत्यक्ष नारायण । कीं दीक्षेचें भविष्यपुराण । पूर्वीच कथिलें पराशरनंदने । महामुनि व्यास तो ॥ ५३ ॥

Transliteration

Yaavaree bole pratyaksha Naaraayanu | Kee deekshe che Bhavishya-Puraanu | Poorveecha kathile Paraashara-nandane | Mahaamuni Vyaasa toh ||

Ovee 54

अगा पूर्वी अठ्ठ्यांयशीं सहस्त्र ऋषी । निर्माण झाले विधिवीर्यासी । तें वीर्य चुकोनि ठायाठायासी । आपाप कांहीं उरलें असे ॥ ५४ ॥

Transliteration

Agaa poorvee aththyaa-yashee sahastra Rishee | Nirmaana jhaale Vidhi-veeryaasee | Tey veerya chukoni thaayaa-thaayaasee | Aapaapa kaanhee urale ase ||

Ovee 55

तें जीवदशे वांचोनि सत्य । महाराजा न पावे उदय । तरी ते ठायीं ठायीं केउतें वीर्य । त्याचे ठाय ऐकावें ॥ ५५ ॥

Transliteration

Tey jeevadashe vaanchoni satyu | Mahaaraajaa na paave udayu | Taree tey thaayee thaayee keute veeryu | Tyaache thaaya aikaave ||

Ovee 56

उपरिचर वसु यानीं असतां । वीर्य गळलें उर्वशी पाहतां । ते शरस्तंबी दुरोनि द्रवतां । आदळतां झालें त्रिभाग ॥ ५६ ॥

Transliteration

Uparichara Vasu yaanee asataa | Veerya galale Urvashee paahataa | Tey shara-stambee duroni dravataa | Aadalataa jhaale tribhaaga ||

Ovee 57

यमुनेंत वीर्यबिंदु द्रोणाकांठीं । पडतांचि झाले विभाग शेवटीं । दोन भाग द्रोणापोटीं । एकजळी पडियेला ॥ ५७ ॥

Transliteration

Yamuneta veerya bindu Dronaa-kaanthee | Padataanchi jhaale vibhaaga shevatee | Dona bhaaga Dronaapotee | Ekajalee padiyelaa ||

Ovee 58

असो पर्णद्रोणांत जो भाग पडिला । तो तत्काळ द्रोणकूपीं जन्मला । परी जळांत जो भाग पडिला । तो ग्रासिलामत्स्यानें ॥ ५८ ॥

Transliteration

Aso parna Dronaata jo bhaaga padilaa | Toh tatkaala Drona-koopee janmalaa | Paree jalaata jo bhaaga padilaa | Toh graasilaa-matsyaane ||

Ovee 59

तरी तें मत्स्युदरीं वीर्य । नारायण प्रत्यक्ष आहे । परी जीवदशेविण गर्भवंशोदय । होत नाहीं महाराजा ॥ ५९ ॥

Transliteration

Taree tey matsyudaree veeryu | Naaraayana pratyaksha aahe | Paree jeeva dashe vinaa garbha-vanshodayu | Hota naahee Mahaaraajaa ||

Ovee 60

तरी प्राज्ञिक कवि नारायण । तेणें मत्स्युदरीं जन्म घेणें । मच्छिंद्र ऐसें जगांत नामानें । मिरवावें महाराजा ॥ ६० ॥

Transliteration

Taree praajnyika kavi Naaraayanu | Tene matsyudaree janma ghene | Machchindra aise jagaata naamaane | Miravaave Mahaaraajaa ||

Ovee 61

यापरी शिव कामावरी कोपोन । तृतीयनेत्रींचा काढोनि अश्र । महास्मर केला भस्म तेणें । ऐसें ग्रंथ बोलती ॥ ६१ ॥

Transliteration

Yaaparee Shiva Kaamaa varee koponu | Triteeya netreechaa kaadhoni Agnu | Mahaasmara kelaa bhasma tene | Aise grantha bolatee ||

Ovee 62

परी तो काम द्विमूर्धनी । बैसला आहे वीर्य प्राशन करोनी । तरी तयाचे जठरीं अंतरिक्ष जाऊनी । जालिंदर नामें मिरवेल ॥ ६२ ॥

Transliteration

Paree toh Kaama dvi moordhanee | Baisalaa aahe veerya praashana karonee | Taree tayaache jatharee Antariksha jaauunee | Jaalindara naame miravela ||

Ovee 63

यापरी कुरुवंशीं जनमेजयें । नागसत्री आवाहन केलें आहे । तया वंशी महान पाहें । बृहद्रथ राणा मिरवेल ॥ ६३ ॥

Transliteration

Yaaparee Kuru vamshee Janamejaye | Naaga satree aavaahana kele aahe | Tayaa vamshee mahaana paahe | Brihadratha raanaa miravela ||

Ovee 64

तो महीलागीं करील हवन । तेव्हां गर्भ सांडील द्विमूर्धन । यज्ञकुंडीं देदिप्यमान । जालिंदरें जन्मावें ॥ ६४ ॥

Transliteration

Toh mahee-laagee kareela havanu | Tevhaa garbha saandeela dvi moordhanu | Yajnya-kundee dedipyamaanu | Jaalindare janmaave ||

Ovee 65

यापरी ब्रह्मवीर्य सहस्त्रेंशीं । ऋषि निर्मिले सहस्त्र अठ्यायशीं । तेव्हां वीर्य रेवातीरासी । रेवेमाजी पडियेलें ॥ ६५ ॥

Transliteration

Yaaparee Brahma veerya sahastren-shee | Rishi nirmile sahastra athyaa-yashee | Tevhaa veerya Revaa-teeraasee | Reve maajee padiyele ||

Ovee 66

तें महीचे परम कुशीं । वीर्य आहे रेवातीरासी । तेथें व्यापोनि जीवदशेसी । देहालागीं मिरवावें ॥ ६६ ॥

Transliteration

Tey maheeche parama kushee | Veerya aahe Revaa-teeraasee | Tethe vyaaponi jeevadashesee | Dehaalaagee miravaave ||

Ovee 67

तो महाराजा चमस नारायण । रेवणसिद्ध मिरविजे नामानें । रेवारेवेंत झाला जन्म । म्हणोनि नाम हे त्याचें ॥ ६७ ॥

Transliteration

Toh Mahaaraajaa Chamasa Naaraayanu | Revana-Siddha miravije naamaane | Revaa reveta jhaalaa janmu | Mhanoni naama hey tyaache ||

Ovee 68

तेचि वेळीं आणिक रेत । सर्पिणीमौळी अकस्मात । पडतां प्राशिले तिनें नेमस्त । भक्ष्य म्हणोनि जाण पां ॥ ६८ ॥

Transliteration

Techi velee aanika retu | Sarpinee-maulee akasmaatu | Padataa praashile tine nemastu | Bhakshya mhanoni jaana paa ||

Ovee 69

ते जनमेजयाचे नागसत्रांत । नाग आहुति विप्र देत । तये वेळीं आस्तिकें निश्चित । सर्पिणीतें लपविलें ॥ ६९ ॥

Transliteration

Tey Janamejayaache Naaga satraatu | Naaga aahuti vipra detu | Taye velee Aastike nishchvitu | Sarpineete lapavile ||

Ovee 70

ब्रह्मवीर्य उदरांत । अंडजाशुक्तिरत्नयुक्त । पुढें होईल महानाथ भविष्य जाणोनि आच्छादी ॥ ७० ॥

Transliteration

Brahma veerya udaraatu | Andaja-shuktee-ratna-yuktu | Pudhe hoeela Mahaanaatha bhavishya jaanoni aachchaadee ||

Ovee 71

महातरुच्या पोखरी । तक्षकात्मजा पद्मिनी नारी । ठेवितां प्राज्ञिक ऋषीश्वरी । नवमास लोटले ॥ ७१ ॥

Transliteration

Mahaa taru chyaa pokharee | Takshaka-aatmajaa Padminee naaree | Thevitaa praajnyika risheeshvaree | Navamaasa lotale ||

Ovee 72

असो त्या अंडजाशुक्तिकायुक्त । जीवदशा सकळ होऊनि मुक्त । तरी आविर्होत्र नारायण तेथ । संचरिजे महाराजा ॥ ७२ ॥

Transliteration

Aso tyaa andaja-shuktikaa-yuktu | Jeeva dashaa sakala houuni muktu | Taree Aavirhotra Naaraayana tethu | Sancharije mahaaraajaa ||

Ovee 73

वीर्य अंडजपात्र सांडोनी । गेली आहे तक्षकनंदिनी । तो वडाच्या पोखरस्थानीं । अद्यापि आहे महाराजा ॥ ७३ ॥

Transliteration

Veerya andaja-paatra saandonee | Gelee aahe Takshaka-Nandinee | Toh vadaachyaa pokhara-sthaanee | Adyaapi aahe mahaaraajaa ||

Ovee 74

तरी तेथें आविर्होत्र । प्रवेश करितां सत्पात्र । वटसिद्धनाथ स्वतंत्र । तया देहीं मिरवावें ॥ ७४ ॥

Transliteration

Taree tethe Aavir hotru | Pravesha karitaa satpaatru | Vata siddha Naatha svatantru | Tayaa dehee miravaave ||

Ovee 75

यापरी मित्ररेत मंत्रसंपत्तीं । कृपें कुरवाळील मच्छिंद्रजती । ती वरदहस्ताची उकरडा विभुती । साचोकार मिरवेल ॥ ७५ ॥

Transliteration

Yaaparee Mitra-reta mantra-sampattee | Kripe kuravaaleela Machchindra-jatee | Tee varadahasta achee ukaradaa vibhutee | Saacho kaara miravela ||

Ovee 76

तें मंत्रप्रतापें सूर्यवीर्य । सविताराज सांडिता होय । परी तें भविष्यकारणीं उकरडामय । वरदभस्म मिरवेल ॥ ७६ ॥

Transliteration

Tey mantra-prataape soorya veeryu | Savitaa raaja saanditaa hoyu | Paree tey bhavishya-kaaranee ukaradaa-mayu | Varada bhasma miravelu ||

Ovee 77

तेथें हरी जो नारायण । शीघ्र संचरोनि दीक्षाकारण । गोरक्ष ऐसें प्रतिष्ठानामानें । जगामाजी मिरवावें ॥ ७७ ॥

Transliteration

Tethe Haree jo Naaraayanu | Sheeghra sancharoni deekshaa kaaranu | Goraksha aise pratishthaa-naamaane | Jagaa-maajee miravaave ||

Ovee 78

यापरी मृडानीकारणी । सुरवर आलिया दक्षसदनीं । ते कमलोद्भव पाकशासनी । समारंभें पातले ॥ ७८ ॥

Transliteration

Yaaparee Mridaanee-kaaranee | Suravara aaliyaa Daksha-sadanee | Tey Kamalodbhava Paakasha-asanee | Samaarambhe paatale ||

Ovee 79

परी दक्षात्मजेची रुपरहाटी । नेत्रकटाक्ष पाहतां परमेष्ठी । तेणें धडाडोनि कामपाठीं । इंद्रियद्वारा द्रवला तो ॥ ७९ ॥

Transliteration

Paree Daksha-aatmajechee rupa-rahaatee | Netra-kataaksha paahataa Parameshthee | Tene dhadaa-doni kaama paathee | Indriya-dvaaraa dravalaa toh ||

Ovee 80

परी तो चतुराननी । बैसला होता सभास्थानीं । काम द्रवतां इंद्रियवदनीं । परम चित्तीं लाजला तो ॥ ८० ॥

Transliteration

Paree toh Chatur Aananee | Baisalaa hotaa samaasthaanee | Kaama dravataa indriya-vadanee | Parama chittee laajalaa toh ||

Ovee 81

मग रगडोनि चरणटांचे । छिन्नत्व केलें रेताचें । तें एक आगळें साठ सहस्त्रांचें । रेतभाग वहियेलें ॥ ८१ ॥

Transliteration

Maga ragadoni charana-taanche | Chinnatva kele retaache | Tey eka aagale saatha sahastraanche | Reta bhaaga vahiyele ||

Ovee 82

तें साठ सहस्त्र रेतप्रमाणासी । जीवदशा अपत्य वालखिल्यऋषींसी । झाले परी एक भागासी । वीर्य आहे तैसेच ॥ ८२ ॥

Transliteration

Tey saatha sahastra reta pramaa-naasee | Jeevadashaa apatya Vaalakhilya-Risheensee | Jhaale paree eka bhaagaasee | Veerya aahe taisecha ||

Ovee 83

तें लज्जायुक्त होऊनी । केरासह सांडिले भागीरथीजीवनीं । तयांतूनि एक भाग जाऊनी । कुशवेटी स्थिरावला ॥ ८३ ॥

Transliteration

Tey lajjaa yukta houunee | Keraa saha saandile Bhaageerathee-jeevanee | Tayaan-tuuni eka bhaaga jaauunee | Kushavantee sthiraavalaa ||

Ovee 84

तरी ते कुदरीचे निखळीं । रेतभागाची आहे वेली । ती पिप्पलायन माउली । संचारावें तेणें तेथें ॥ ८४ ॥

Transliteration

Taree tey kusha dareeche nikhalee | Reta-bhaagaachee aahe velee | Tee Pippalaayana maaulee | Sanchaaraave tene tethe ||

Ovee 85

टांचे चरपटलें आहे रेत । म्हणोनि नाम चरपटनाथ । जगांत मिरवोनि जगविख्यात । दीक्षेलागीं विराजावा ॥ ८५ ॥

Transliteration

Taanche charapatale aahe retu | Mhanoni naama Charpata Naathu | Jagaata miravoni jaga-vikhyaatu | Deekshe-laagee viraajaavaa ||

Ovee 86

यापरी कुंभोद्भवाचा उदय झाला । तो मित्रकामशराचा लोट लोटला । तो गगनपंथे विमुक्त झाला । अतिबळें करोनियां ॥ ८६ ॥

Transliteration

Yaaparee Kumbha-Udbhavaachaa udaya jhaalaa | Toh Mitra kaama shara achaa lota lotalaa | Toh gagana-panthe vimukta jhaalaa | Ati bale karoniyaa ||

Ovee 87

एक भाग घटीं पडतां । अगस्तिउदय झाला तत्त्वतां । एक भाग महीवरता । कैलिकसदनीं पातला ॥ ८७ ॥

Transliteration

Eka bhaaga ghatee padataa | Agasti udaya jhaalaa tattvataa | Eka bhaaga mahee-varataa | Kailika-sadanee paatalaa ||

Ovee 88

तो महाराज कैलिकऋषी । भिक्षाभरतरी ऊर्वशी । भरतरी म्हणती भिक्षापात्रासी । आंगणीं तें ठेविलें ॥ ८८ ॥

Transliteration

Toh Mahaaraaja Kailika-Rishee | Bhikshaa-Bharataree Urvashee | Bharataree mhanatee bhikshaa-paatraasee | Aanganee tey thevile ||

Ovee 89

तो मित्ररेत अकस्मात । येऊनि पडिलें भरतरीआंत । तें कैलिकें पाहोनि भविष्यांतें । भरतरी तैसें रक्षितसे ॥ ८९ ॥

Transliteration

Toh Mitra reta akasmaatu | Yeuuni padile Bharataree aatu | Tey Kailike paahoni bhavishyaate | Bharataree taise rakshitase ||

Ovee 90

तरी ते भरतरीरेतसंगीं । द्रुमिल नारायण प्रसंगीं । संचारोनि रेत अंगीं । भरतरी नामें मिरविजे ॥ ९० ॥

Transliteration

Taree tey Bharataree-reta-sangee | Drumila Naaraayana prasangee | Sanchaaroni reta angee | Bharataree naame miravije ||

Ovee 91

यापरी हिमाद्रीच्या विपिनस्थानीं । दिग्गज ठेला महीते शयनीं । तैं सरस्वतीचे उद्देशेंकरोनी । विधि वीर्यासी ढांसळला ॥ ९१ ॥

Transliteration

Yaaparee Himaadree-chyaa vipina-sthaanee | Diggaja thelaa maheete shayanee | Tai Sarasvatee che uddeshe karonee | Vidhi-veeryaasee dhaasalalaa ||

Ovee 92

तें वीर्य गजकर्णांत । पडतांचि झाले बिंदयुक्त । तरी कांहींसें वीर्य होऊनि विभक्त । महीवरती पडियेले ॥ ९२ ॥

Transliteration

Tey veerya gaja karnaatu | Padataanchi jhaale binda yuktu | Taree kaaheese veerya houuni vibhaktu | Mahee varatee padiyele ||

Ovee 93

तयावरोनि व्याघ्र चाली । चालता भेदलें पाउलीं । तया पादसंधींत तनु ओतिली । जीवदशा अत्रीची ॥ ९३ ॥

Transliteration

Tayaa varoni vyaaghra chaalee | Chaalataa bhedale paaulee | Tayaa paada sandheeta tanu otilee | Jeeva dashaa Atreechee ||

Ovee 94

तैसा गजकर्णसूतिकारण । प्रबुद्ध मिरविजे रेतरत्न । तया नामाभिधानी प्रयत्न । कर्णकानिफा मिरविजे ॥ ९४ ॥

Transliteration

Taisaa gaja Karna sooti kaaranu | Prabuddha miravije reta ratnu | Tayaa naama abhi dhaanee prayatnu | Karna-Kaaniphaa miravije ||

Ovee 95

यापरी गोरक्षाची हतवटी । पडतां वाळवंटाचे पोटी । कर्दमपुतळा करितां जेठी । अभिमंत्रोनि भविष्यांतर ॥ ९५ ॥

Transliteration

Yaaparee Gorakshaachee hatavatee | Padataa vaala-vantaache potee | Kardama-putalaa karitaa jethee | Abhi mantroni bhavishya-antara ||

Ovee 96

मंत्रशक्तीं विष्णुवीर्य । आव्हानिलिया पुतळामय । तैं करभाजनें संचराया । जीवदशा मिरवावी ॥ ९६ ॥

Transliteration

Mantra-shaktee Vishnu veeryu | Aavhaa niliyaa putalaamayu | Tai Karabhaajane sancharaayaa | Jeeva dashaa miravaavee ||

Ovee 97

ऐसें सांगोनि रमारमणे । संतुष्ट केले नवनारायण । मग परस्परें नमनानमन । करोनियां उठले ते ॥ ९७ ॥

Transliteration

Aise saangoni Ramaa Ramane | Santushta kele Nava Naaraayanu | Maga paraspare namanaa namanu | Karoniyaa uthale tey ||

Ovee 98

असो भगवंतेशीं नवनारायण । पाहती मंदराचळमौळीस्थान । श्रीशुकाचार्य समाधीपासीं जाऊन । समाधीतें वरियेलें ॥ ९८ ॥

Transliteration

Aso bhagavanteshee Nava Naaraayanu | Paahatee Mandaraa-chala maulee sthaanu | Shree-Shuka-Aachaarya samaadhee-paasee jaauunu | Samaadhee variyele ||

Ovee 99

नव समाधी मेरुपाठारी । दहावी समाधी शुकऋषीश्वरीं । असो ते दाही स्थूळशरीरीं । पुढे तेथोनियां निघाले ॥ ९९ ॥

Transliteration

Nava samaadhee Meru-paathaaree | Dahaavee samaadhee Shuka-Risheeshvaree | Aso tey daahee sthoola-shareeree | Pudhe tethoniyaa nighaale ||

Ovee 100

यापरी शुकवीर्याचें कथन । बद्रिकाश्रमीं सोमब्राह्मण । रंभाउद्देशें झालें पतन । कबीर तेथे जन्मला ॥ १०० ॥

Transliteration

Yaaparee Shuka veeryaa che kathanu | Badrikaa-Aashramee Soma-braahmanu | Rambhaa-uddeshe jhaale patanu | Kabeera tethe janmalaa ||

Ovee 101

ही कथा भक्तिकथामृतांत । वदविली आहे जगन्नाथें । आतां नवनारायण झालें व्यक्त । त्यांची कथा ऐकावी ॥ १०१ ॥

Transliteration

Hee kathaa Bhakti Kathaa Amritaatu | Vadavilee aahe Jagannaathe | Aataa Nava Naaraayana jhaale vyaktu | Tyaanchee kathaa aikaavee ||

Ovee 102

असो वसुवीर्य दोन्ही भाग झाला । एक मच्छीने प्राशिला । तंव कवि नारायण संचरोनि वहिला । गर्भ लागला वाढीसी ॥ १०२ ॥

Transliteration

Aso Vasuveerya donhee bhaaga jhaalaa | Eka machcheene praashilaa | Tava kavi Naaraayana sancharoni vahilaa | Garbha laagalaa vaadheesee ||

Ovee 103

दिवसानुदिवस नवमास । मच्छीने लोटिले जलोदरास । पुढे प्रसूत अंडज सुरस । यमुनाजळीं व्हावें जों ॥ १०३ ॥

Transliteration

Divasaanu-divasa navamaasu | Machcheene lotile jalodaraasu | Pudhe prasoota andaja surasu | Yamunaa-jalee vhaave jo ||

Ovee 104

तों तेथें एक कथा वर्तली । श्रीकैलासीं अपर्णा माउली । शिवासी म्हणे कृपासाउली । अनुग्रह मज द्यावा जी ॥ १०४ ॥

Transliteration

Toh tethe eka kathaa vartalee | Shree-Kailaasee Aparnaa maaulee | Shivaasee mhane kripaa-saaulee | Anugraha maja dyaavaa jee ||

Ovee 105

तुम्ही जपता जो मंत्र । तो मज द्यावा जी पवित्र । तेणेंकरोनि मी चिर । सनाथपणें मिरवेन जी ॥ १०५ ॥

Transliteration

Tumhee japataa jo mantru | Toh maja dyaavaa jee pavitru | Tene karoni mee chiru | Sanaatha-pane miravena jee ||

Ovee 106

शिव म्हणे उमे ऐक । मी मंत्र उपदेशीन सकळिक । परी एकांत ठाव अलोलिक । ऐसा जाण पाहिजे गे ॥ १०६ ॥

Transliteration

Shiva mhane Ume aiku | Mee mantra upadesheena sakaliku | Paree ekaata thaava aloliku | Aisaa jaana paahile ge ||

Ovee 107

अपर्णा म्हणे एकांतस्थान । तरी महीवरी शोधूं आपण । ऐसें ऐकतां दयाघन । अवश्य तीतें म्हणतसे ॥ १०७ ॥

Transliteration

Aparnaa mhane ekaata sthaanu | Taree maheevaree shodhoo aapanu | Aise aikataa dayaaghanu | Avashya teete mhanatase ||

Ovee 108

मग सिद्ध करोनि नंदिकेश्वर । हिंडतां स्थानें महीवर । श्रमोनि वर्ततां उमाईश्वर । यमुनेतटीं येऊनि पोंचले ॥ १०८ ॥

Transliteration

Maga siddha karoni Nandikeshvaru | Hindataa sthaane maheevaru | Shramoni vartataa Umaa Eashvaru | Yamuneta tee yeuuni ponchale ||

Ovee 109

मग उतरोनि नंदिकेश्वरावरुनि तीं । नंदी ठेवोनि तटावरती । उभयतां उतरोनि यमुनेसरितीं । जवळ कांठीं बैसलीं ॥ १०९ ॥

Transliteration

Maga utaroni Nandikeshvaraa-varuni tee | Nandee thevoni tataa-varatee | Ubhayataa utaroni Yamune-saritee | Javala kaathee baisalee ||

Ovee 110

तंव तो यमुनातटएकांत । तेथें मनुष्यांची न मिळे जात । ऐसें पाहोनि शुद्ध एकांत । तें स्थान ईश्वरासी मानलें ॥ ११० ॥

Transliteration

Tava toh Yamunaa-tata-ekaantu | Tethe manushyaanchee na mile jaatu | Aise paahoni shuddha ekaantu | Tey sthaana Eashvaraasee maanale ||

Ovee 111

परी तो मच्छोदरांत । कवि नारायण नेणोनि त्यांत । पार्वतीतें उपदेशित । मंत्रसंजीवनीसी नाथ ॥ १११ ॥

Transliteration

Paree toh machodaraatu | Kavi Naaraayana nenoni tyaatu | Paarvateete upadeshitu | Mantra-sanjeevaneesee Naathu ||

Ovee 112

तीतें तो मंत्र उपदेशितां । मच्छी तेथें होती सत्यता । तो उपदेशशब्द गर्भी तत्त्वतां । मच्छिंद्रानें ऐकला ॥ ११२ ॥

Transliteration

Teete toh mantra upadeshitaa | Machchee tethe hotee satyataa | Toh upadesha-shabda garbhee tattvataa | Machchindraane aikalaa |

Ovee 113

ऐकलेपरी ग्रहणचि झालें । तेणें करुनि ज्ञान प्रगटलें । मीतूंपण सर्व सरलें । सर्वचि ब्रह्म सनातन ॥ ११३ ॥

Transliteration

Aikale paree grahana chi jhaale | Tene karuni jnyaana pragatale | Meetoompana sarva sarale | Sarvachi Brahma sanaatana ||

Ovee 114

असो शिव पार्वतीतें पुसत । कीं कैसें चोज उपदेशांत । तूतें सांपडेल खूण ते मातें । बोलोनि दावीं अपर्णे तूं ॥ ११४ ॥

Transliteration

Aso Shiva Paarvateete pusatu | Kee kaise choja upadeshaantu | Toote saampadela khoona tey maate | Boloni daavee Aparne too ||

Ovee 115

ऐसें शिव तीस पुसतां । तों आधींच मच्छेंद्र झाला बोलता । म्हणे महाराजा आदिनाथा । ब्रह्मवोज मिरवेल ॥ ११५ ॥

Transliteration

Aise Shiva teesa pusataa | Toh aadheencha Machchendra jhaalaa bolataa | Mhane Mahaaraajaa Aadi-Naathaa | Brahmavoja miravelu ||

Ovee 116

आतां किंबहुना चराचरा । असे स्वरुपीं वृत्ति साकार । नग नोहे हेमचि सार । आब्रह्मभुवनापासोनी ॥ ११६ ॥

Transliteration

Aataa kimbahunaa charaacharaa | Ase svarupee vritti saakaaru | Naga nohe hemachi saaru | Aa-Brahma-bhuvanaa-paasonee ||

Ovee 117

ऐसें शिव ऐकतां वचना । जळीं पाहे चाकटोन । तों मच्छोदरीं नारायण । कवि महाराज समजला ॥ ११७ ॥

Transliteration

Aise Shiva aikataa vachanaa | Jalee paahe chaakatonu | Toh machcha-udaree Naaraayanu | Kavi mahaaraaja samajalaa ||

Ovee 118

मग शंकर बोलते झाले त्याते । म्हणती महाराज तूं आहेस तेथें । तरी मम उपदेशाचा तूतें । लाभ झाला कविराया ॥ ११८ ॥

Transliteration

Maga Shankara bolate jhaale tyaate | Mhanatee mahaaraaja too aahesi tethe | Taree mama upadeshaachaa toote | Laabha jhaalaa Kavi Raayaa ||

Ovee 119

परी हे फारचि झालें अपूर्व । पुढें ऐक आनंदपर्व । मंत्रउपदेशगौरव । दत्तमुखीं करवीन मी ॥ ११९ ॥

Transliteration

Paree hey phaarachi jhaale apoorvu | Pudhe aika aananda-parvu | Mantra-upadesha-gauravu | Datta mukhee karaveena mee ||

Ovee 120

तरी तुज जन्म झालियापाठीं । बद्रिकाश्रमीं यावे शेवटी । तेथे तूतें देईन भेटी । सर्व सामग्री सचिन्ह ॥ १२० ॥

Transliteration

Taree tuja janma jhaaliyaa paathee | Badrikaa-Aashramee yaave shevatee | Tethe toote deeena bhetee | Sarva saamagree sachinha ||

Ovee 121

ऐसें बोलोनि आदिनाथ । स्वस्थाना गेला अपर्णेसहित । येरीकडे गर्भ मच्छोदरांत । तोचि मंत्र घोकीतसे ॥ १२१ ॥

Transliteration

Aise boloni Aadinaathu | Svasthaanaa gelaa Aparne-sahitu | Yeree kade garbha machcha-udaraantu | Tochi mantra ghokeetase ||

Ovee 122

यापरी भरतां पूर्ण दिवस । मच्छीने प्रसूतकळा समयास । अंड सांडोनि जळतटास । मच्छी गेली जळोदरीं ॥ १२२ ॥

Transliteration

Yaaparee bharataa poorna divasu | Machcheene prasoota-kalaa samayaasu | Anda saandoni jala tataasu | Machchee gelee jalodaree ||

Ovee 123

असो अंड सांडोनि तीरास । मच्छी गेली जळोदरास । त्यास काहीं लोटल्या दिवस । यमुनातीरीं महाराजा ॥ १२३ ॥

Transliteration

Aso anda saandoni teeraasu | Machchee gelee jalodaraasu | Tyaasa kaahee lotalyaa divasu | Yamunaa-teeree Mahaaraajaa ||

Ovee 124

तंव तेथे समयकाळीं । बकपक्ष्यांची उतरली मंडळी । मीन वेंचावया यमुनाजळीं । निजगणासहित संचरले ॥ १२४ ॥

Transliteration

Tava tethe samaya-kaalee | Baka-pakshyaanchee utaralee mandalee | Meena venchaavayaa Yamunaa-jalee | Nija-ganaa-sahita sancharale ||

Ovee 125

तो अकस्मात मित्रात्मजातटी । अंडजशुक्तिका पाहिली दृष्टीं । मग सर्व मिळोनि चंचुपुटी । खाद्य म्हणोनि भेदिती ते ॥ १२५ ॥

Transliteration

Toh akasmaata Mitra-aatmajaa-tatee | Andaja-shuktikaa paahilee drishtee | Maga sarva miloni chanchu-putee | Khaadya mhanoni bheditee tey ||

Ovee 126

चंचुपुटांचा भेदवज्र । तेणे अंड झाले जर्जर । द्विशकल होऊनि सत्वर । महीवरी आदळलें ॥ १२६ ॥

Transliteration

Chanchu-putaanchaa bheda vajru | Tene anda jhaale jarjaru | Dvishakala houuni satvaru | Maheevaree aadalale ||

Ovee 127

परी वरील शकल पडिले मही । खालील शकलांत बाळ विदेही । जैसा अर्क उदकप्रवाहीं । एकाएकीं उतरला ॥ १२७ ॥

Transliteration

Paree vareela shakala padile mahee | Khaaleela shakalaata baala videhee | Jaisaa arka udaka pravaahee | Ekaa ekee utaralaa ||

Ovee 128

रुदनशब्द कडकडाट । बाळतेजाचा बोभाट । तें न्याहाळितां चकचकाट । पाहोनिया पळाले ते ॥ १२८ ॥

Transliteration

Rudana shabda kada-kadaatu | Baala teja achaa bobhaatu | Tey nyaahaalitaa chaka-chakaatu | Paahoniyaa palaale tey ||

Ovee 129

अ सो सकळशुक्तिका रत्नाकर । आंत मुक्तमुक्तिकेचाच भद्र मच्छेंद्र । असतां तमारिकन्यातीर । पावला धीवर त्या काळीं ॥ १२९ ॥

Transliteration

Aso sakala-shuktikaa ratnaakaru | Aata mukta mukti kechaa cha Bhadra Machchendru | Asataa Tamaari-kanyaa-teeru | Paavalaa dheevara tyaa kaalee ||

Ovee 130

तो धीवर कामिकनाम सुभट । पाहतां अंडज प्रकट । तों आंत रत्नतेज स्फुट । बाळ रम्य देखिला ॥ १३० ॥

Transliteration

Toh dheevara Kaamika-naama subhatu | Paahataa andaja shuktika prakatu | Toh aanta ratna teja sphutu | Baala ramya dekhilaa ||

Ovee 131

देखिला परी जो सविता । मग चित्तीं द्रवली मोहममता । म्हणे बाळ हें कोमळ तत्त्वतां । यातें भक्षील कोणी सावज ॥ १३१ ॥

Transliteration

Dekhilaa paree jo Savitaa | Maga chittee dravalee moha mamataa | Mhane baala hey komala tattvataa | Yaate bhaksheela konee saavaja ||

Ovee 132

ऐसा उदय होतां चित्तीं । देव शब्दकुसुमा सांडिती । कीं हे महाराजा कामिकमूर्ती । बाळ नेई वो सदनातें ॥ १३२ ॥

Transliteration

Aisaa udaya hotaa chittee | Deva shabda-kusumaa saanditee | Kee hey Mahaaraajaa Kaamika-Moortee | Baala neee vo sadanaate ||

Ovee 133

अरे हा कवि नारायण । मच्छोदरी पावला जनन । तरी मच्छेंद्र ऐसें यातें नाम । जगामाजीं मिरवीं कीं ॥ १३३ ॥

Transliteration

Arey haa Kavi Naaraayanu | Machchodaree paavalaa jananu | Taree Machchendra aise yaate naamu | Jagaa-maajee miravee kee ||

Ovee 134

अरे हा दक्ष योगींद्रजेठी । तारक नौका महीपाठीं । तरी तूं संशय सोडोनि पोटीं । सदना नेईं महाराजा ॥ १३४ ॥

Transliteration

Arey haa daksha Yogeendra-jethee | Taaraka naukaa mahee paathee | Taree too sanshaya sodoni potee | Sadanaa neee Mahaaraajaa ||

Ovee 135

ऐसे देववागुत्तररत्न । कर्णपुटिकं होतां भूषण । मग तें दृढ करोनि जतन । हृदयसंपुटीं पाळीतसे ॥ १३५ ॥

Transliteration

Aise Deva-vaagu-uttara-ratnu | Karnaputika hotaa bhooshanu | Maga tey dridha karoni jatanu | Hridaya-samputee paaleetase ||

Ovee 136

महाविश्वासाचे पाठीं । आधींच मोह नांदेल पोटीं । आनंदाची अपार दाटी । आनंदपात्रीं हेलावे ॥ १३६ ॥

Transliteration

Mahaa-vishvaasaache paathee | Aadheencha moha naandela potee | Aananda achee apaara daatee | Aananda paatree helaave ||

Ovee 137

जैसें पयाचेनि पात्रीं । घृतशर्करा होय मिश्रिती । तो गोडपणाचा भाग अमृतीं । वाढला कां जाईना ॥ १३७ ॥

Transliteration

Jaise payaacheni paatree | Ghrita-sharkaraa hoya mishritee | Toh goda pana achaa bhaaga amritee | Vaadhalaa kaa jaaeenaa ||

Ovee 138

कीं दरिद्राचे सुरवाडास । मनी पेटली राजहौस । ते गजशुंडींची माळा ग्रीवेस । सुख कां वाटलें जाईना ॥ १३८ ॥

Transliteration

Kee daridraache sura-vaadaasu | Manee petalee raaja hausu | Tey gaja shundeechee maalaa greevesu | Sukha kaa vaatale jaaeenaa ||

Ovee 139

कीं वंशवृद्धि ते शून्यमय । चिंताकाळिमा निशा आहे । तैसा सुतमित्राचा होतां उदय । मग तेथ चिंता कासया ॥ १३९ ॥

Transliteration

Kee vamsha vriddhi tey shuunyamayu | Chintaa-kaalimaa nishaa aahe | Taisaa suta Mitra achaa hotaa udayu | Maga tetha chintaa kaasayaa ||

Ovee 140

कीं कवडीसाठीं वेंचिता प्राण । ते मांदूसचि लाधली सुखधन । कीं मृत्युभयातें असुख मानून । चित्त जडे चिंतासाकडीं ॥ १४० ॥

Transliteration

Kee kavadee-saathee vonchitaa praanu | Tey maandoosachi laadhalee sukha dhanu | Kee mrityu bhayaate asukha maanuunu | Chitta jade chintaa-saakadee ||

Ovee 141

तों पीयूषाची अनुकूलता । गोडी सुखाचा उदय होतां । मग चिंतानिशीचा आनंदसविता । प्रमेलागीं हेलावे ॥ १४१ ॥

Transliteration

Toh peeyooshaa chee anukoolataa | Godee sukha achaa udaya hotaa | Maga chintaa-nisheechaa aananda Savitaa | Pramelaagee helaave ||

Ovee 142

मग स्नेहकवचें करसंपुटी । तोयें न्हाणिला बाळजेठी । हृदयीं वाहूनि कामिक पोटीं । सदनीं आणिलें तयातें ॥ १४२ ॥

Transliteration

Maga sneha-kavache kara-samputee | Toye nhaanilaa baala jethee | Hridayee vaahuuni Kaamika potee | Sadanee aanile tayaate ||

Ovee 143

शारद्वता नामें सुंदरा नारी । ओपिता झाला तिचे करीं । म्हणे साजणी वंशाधारी । सुत मिरवीं लोकांत ॥ १४३ ॥

Transliteration

Shaaradvataa naame sundaraa naaree | Opitaa jhaalaa tiche karee | Mhane saajanee vamsha aadhaaree | Suta miravee lokaata ||

Ovee 144

कीं पाहें पां पूर्ण भरंवसा । कीं राधातनय कर्ण जैसा । तरी तो पुढें राजमांदुसा । जगामाजी आव्हानी ॥ १४४ ॥

Transliteration

Kee paahe paa poorna bharavasaa | Kee Raadhaa-tanaya Karna jaisaa | Taree toh pudhe raaja-maandusaa | Jagaa-maajee aavhaanee ||

Ovee 145

तन्न्यायें भाग्योदयें । सर्व सुखशयनीं पहुडावे । अहाहा बाळ अवतार होय । कवि नारायण मच्छेंद्र ॥ १४५ ॥

Transliteration

Tannyaaye bhaagyodaye | Sarva sukha shayanee pahudaave | Ahaahaa baala avataara hoyu | Kavi Naaraayana Machchendra ||

Ovee 146

मग कामिकहाती सुढाळ सुता । नवरत्नांच्या सम पाहतां । परम आनंदली शारद्वता । बाळ कवळिला स्नेहमेळीं ॥ १४६ ॥

Transliteration

Maga Kaamika-haatee sudhaala sutaa | Nava-ratnaanchyaa sama paahataa | Parama aanandalee Shaaradvataa | Baala kavalilaa sneha melee ||

Ovee 147

स्नेहें धरितांचि पयोधरी । पय दाटलें अतिपाझरीं । जैसे सोमतेजकरी । सोमकांत द्रवतसे ॥ १४७ ॥

Transliteration

Snehe dharitaanchi payodharee | Paya daatale ati-paajharee | Jaise Soma-teja-karee | Somakaanta dravatase ||

Ovee 148

असो कुशांचें मंडन । स्नेहभावें होतां संगोपन । मग बाळजठरपिंडीचा अग्न । पय पाहोनि स्वीकारी ॥ १४८ ॥

Transliteration

Aso kushaanche mandanu | Sneha bhaave hotaa sangopanu | Maga baala-jathara-pindeechaa agnu | Paya paahoni sveekaaree ||

Ovee 149

तैं स्नेहाचा ओघ बाणे । बाळ अंगिकारोनि मार्जनें । तप्तोदकीं घालोनि स्नानें । पालखातें हालवितसे ॥ १४९ ॥

Transliteration

Tai sneha achaa ogha baane | Baala angikaaroni maarjane | Tapto dakee ghaaloni snaane | Paalakhaate haalavitase ||

Ovee 150

आधींच नामें शारद्वता । त्यावरी अपत्यकामी कांता । तेथे बाळमोहकाम द्रवतां । कवण रीतीं वर्णावें ॥ १५० ॥

Transliteration

Aadheencha naame Shaaradvataa | Tyaa-varee apatya-kaamee kaantaa | Tethe baala moha kaama dravataa | Kavana reetee varnaave ||

Ovee 151

आधींच असतां अमरवेली । त्यावरी पर्जन्यवृष्टि झाली । मग तो हेलावा लवलव पाउलीं । कवणासी वर्णवे ॥ १५१ ॥

Transliteration

Aadheencha asataa amaravelee | Tyaa-varee parjanya-vrishti jhaalee | Maga toh helaavaa lavalava paaulee | Kavanaasee varnave ||

Ovee 152

ऐसेपरी आनंदस्थितीं । दिवस लोटले कांहीसे मिती । पांच वरुषें वयावरुती । मच्छिंद्रनाथ मिरवला ॥ १५२ ॥

Transliteration

Aise paree aananda sthitee | Divasa lotale kaaheese mitee | Paancha varushe vayaa-varutee | Machchindra-Naatha miravalaa ||

Ovee 153

तंव कोणे एके दिवसी । सुदिनीं उदईक भूमीसी । पिता म्हणे तमारिकन्येसी । चला जाऊं ये मच्छिंद्रा ॥ १५३ ॥

Transliteration

Tava kone eke divasee | Sudinee udaeeka bhoomeesee | Pitaa mhane Tamaari-kanyesee | Chalaa jaaoo ye Machchindraa ||

Ovee 154

अवश्य म्हणे मच्छिंद्रनाथ । कृतांतभगिनीतीरा येत । मग जळोदरीं संचरोनि तात । मच्छबाळां आव्हानीतसे ॥ १५४ ॥

Transliteration

Avashya mhane Machchindra-Naathu | Kritaanta-Bhaginee-teeraa yetu | Maga jalodaree sancharoni taatu | Machcha-baalaa aavhaa neetase ||

Ovee 155

तंव जाळ्यासवें मीनधाडी । आंतुल्या ओढी करसंपुटी । बाहेर काढितां कामिक जेठी । महीं मीनांतें सोडीतसे ॥ १५५ ॥

Transliteration

Tava jaalyaasave meena-dhaadee | Aantulyaa odhee kara-samputee | Baahera kaadhitaa Kaamika jethee | Mahee meenaate sodeetase ||

Ovee 156

मच्छिंद्रासी म्हणे सुतोत्तमा । वेचोनि सांठवी या मीनां । ऐसे वदोनि कामिक पुन्हां । जळमाजी संचरे ॥ १५६ ॥

Transliteration

Machchindraasee mhane sutottamaa | Vechoni saanthavee yaa meenaa | Aise vadoni Kaamika punhaa | Jala maajee sanchare ||

Ovee 157

येरीकडे मच्छिंद्रनाथ । मीन देखतां म्हणे हो तात । अहा मातुळकुळा घात । कामिका ताता मांडिला ॥ १५७ ॥

Transliteration

Yereekade Machchindra-Naathu | Meena dekhataa mhane ho taatu | Ahaa maatula-kulaa ghaatu | Kaamikaa taataa maandilaa ||

Ovee 158

तरी आपण असतां ऐसी रहाटी । बरवेपणें पाहतां दृष्टी । हें योग्य नव्हे कर्म पाठीं । उपकारा मिरवावें ॥ १५८ ॥

Transliteration

Taree aapana asataa aisee rahaatee | Barave pane paahataa drishtee | Hey yogya navhe karma paathee | Upakaaraa miravaave ||

Ovee 159

पूर्वी आस्तिकें मातुळकुळा रक्षिलें । आपुले तपाचेनि बळें । राव बोधोनि सत्रपाळ । नागकुळा वाचविले ॥ १५९ ॥

Transliteration

Poorvee Aastike maatula-kulaa rakshile | Aapule tapaa-cheni bale | Raava bodhoni satrapaalu | Naaga kulaa vaachavile ||

Ovee 160

मग एक एक मत्स्य वेचोनि । प्रवाहा मेळवी जीवनालागोनी । तें कामिकतातें दृष्टीनें पाहोनी । परम चित्तीं क्षोभला ॥ १६० ॥

Transliteration

Maga eka eka matsya vechoni | Pravaahaa melavee jeevanaa-laagonee | Tey Kaamika-taate drishteene paahonee | Parama chittee kshobhalaa ||

Ovee 161

जैसा परम सबळ । पेटला मिरवी वडवानळ । तेवीं कामिकक्रोधाग्नि प्रबळ । हृदयामाजी धडाडी ॥ १६१ ॥

Transliteration

Jaisaa parama sabalu | Petalaa miravee vadavaanalu | Tevee Kaamika-krodha-agni prabalu | Hridayaa-maajee dhadaadee ||

Ovee 162

कीं मेघमंडळाचे दाटीं । चपळा पळती तेजावाटी । तैसा धडाडोनि क्रोध पोटीं । बाहेर आला तत्क्षणीं ॥ १६२ ॥

Transliteration

Kee megha-mandalaache daatee | Chapalaa palatee tejaa vaatee | Taisaa dhadaadoni krodha potee | Baahera aalaa tatkshanee ||

Ovee 163

लक्षोनि मच्छिंद्राचें मुखमंडन । स्वकरपुटी केले ताडन । म्हणे जळोदरीचे काढितां मीन । बहु श्रम जाणसी ॥ १६३ ॥

Transliteration

Lakshoni Machchindraache mukha-mandanu | Svakara-putee kele taadanu | Mhane jalodareeche kaadhitaa meenu | Bahu shrama jaanasee ||

Ovee 164

तरी पुन्हां जळोदरी । मच्छ सोडितोसी कैसा भिकारी । खासील काय उदरांतरी । भीक मागों जाशील ॥ १६४ ॥

Transliteration

Taree punhaa jalodaree | Machcha soditosee kaisaa bhikaaree | Khaaseela kaaya udara antaree | Bheeka maago jaasheelu ||

Ovee 165

ऐसे ऐकोनि कमिकवचन । मनांत मच्छिंद्र करी बोलणें । सर्वांत पवित्र भिक्षान्न । दोष त्यासी कांहीं नसे ॥ १६५ ॥

Transliteration

Aise aikoni Kaamika-vachanu | Manaata Machchindra karee bolane | Sarvaata pavitra bhikshaannu | Dosha tyaasee kaanhee nase ||

Ovee 166

तरी हाचि आतां उपदेश । आरंभावे भिक्षान्नास । येरीकडे जळोदरास । कामिक तेव्हां संचरला ॥ १६६ ॥

Transliteration

Taree haachi aataa upadeshu | Aarambhaave bhikshaa-annaasu | Yereekade jalodaraasu | Kaamika tevhaa sancharalaa ||

Ovee 167

येरीकडे मच्छिंद्रनाथ दृष्टी चुकवोनि गमन करीत । भ्रमण करितां अद्वैतवनांत । सुढाळ जागा दिसेना ॥ १६७ ॥

Transliteration

Yereekade Machchindra-Naathu |Drishtee chukavoni gamana kareetu | Bhramana karitaa Advaita vanaatu | Sudhaala jaagaa dise-naa||

Ovee 168

मग उत्तरदिशा बद्रिकाश्रम । पाहतां झाला योगद्रुम । तेथें द्वादश वर्षे उत्तमोत्तम । योगालागी आचरला ॥ १६८ ॥

Transliteration

Maga uttara dishaa Badrikaa-Aashramu | Paahataa jhaalaa yoga-drumu | Tethe dvaadasha varshe uttamottamu | Yogaa laagee aacharalaa ||

Ovee 169

तें तीव्र तप गा शुचिस्मंत । मंत्रदृष्टी अद्वैतवनांत । लोहकंटक पादांगुष्ठांत । देऊनि तप करीतसे ॥१६९ ॥

Transliteration

Tey teevra tapa gaa shuchi-smantu | Mantra drishtee Advaita vanaatu | Lohakantaka paadaan gushthatu | Deuuni tapa kareetase ||

Ovee 170

ऊर्ध्व वायूचे करुनि भक्षण । दृष्टी अर्का देऊनि दान । वाचा करोनि कृष्णार्पण । हरीभजनीं मिरविला ॥ १७० ॥

Transliteration

Oordhva vaayuche karuni bhakshanu | Drishtee Arkaa deuuni daanu | Vaachaa karoni Krishna-arpanu | Haree-bhajanee miravilaa ||

Ovee 171

शरीर क्लेशा देऊनि दान । ईश्वरी वेध तनुमनप्रमाणें । तेणें अस्थिपंजरावरोन । त्वचा तितुकी मिरवीतसे ॥ १७१ ॥

Transliteration

Shareera kleshaa deuuni daanu | Eeshvaree vedha tanu-mana-pramaane | Tene asthi-panjaraa-varonu | Tvachaa titukee miraveetase ||

Ovee 172

तपें भक्षिलें सकळ मांस । परी लाग न लागे अस्थित्वचेस । मांस भक्षोनि सकळ भागास । वृद्धिरस सकळ आटिलें ॥ १७२ ॥

Transliteration

Tape bhakshile sakala maasu | Paree laaga na laage asthitvachesu | Maaunsa bhakshoni sakala bhaagaasu | Vriddhirasa sakala aatile ||

Ovee 173

नेत्र फिरोनि झाल्या वाती । दिसों लागली कार्पासरीती । सकळ तेजाची आटली ज्योति । महाघोर तपानें ॥ १७३ ॥

Transliteration

Netra phironi jhaalyaa vaatee | Diso laagalee kaarpaasa-reetee | Sakala tejaachee aatalee jyoti | Mahaa ghora tapaane ||

Ovee 174

अस्थि त्वचा व्यक्त होऊनी । शिरा दिसती चांगुलपणीं । सर्व अंग गेले वाळोनि । काष्ठापरी मिरवितसे ॥ १७४ ॥

Transliteration

Asthi tvachaa vyakta houunee | Shiraa disatee chaangula panee | Sarva anga gele vaaloni | Kaashthaa paree miravitase ||

Ovee 175

ऐसे क्लेश असंभवित । मच्छिंद्रअंगी जाणवत । तों तेथें अकस्मात । अत्रिनंदन पातला ॥ १७५ ॥

Transliteration

Aise klesha asambhavitu | Machchindra-angee jaanavatu | Toh tethe akasmaatu | Atrinandana paatalaa ||

Ovee 176

संचरोनि देवालया । स्तविता झाला उमाराया । हे दक्षजामाता करुणालया । दिगंबरा आदिपुरुषा ॥ १७६ ॥

Transliteration

Sancharoni devaalayaa | Stavitaa jhaalaa Umaa raayaa | Hey daksha jaa maataa karunaa-aalayaa | Digambaraa aadi-purushaa ||

Ovee 177

कामांतका फणिवेष्टका । रुंडभूषणा कैलासनायका । अपर्णानिधाना कामांतका । वृषभारोहणा महाराजा ॥ १७७ ॥

Transliteration

Kaamaantakaa phani-veshtakaa | Runda-bhooshanaa Kailaasa-naayakaa | Aparnaa-nidhaanaa Kaama-antakaa | Vrishabha-aarohanaa Mahaaraajaa ||

Ovee 178
हे सकळ दानवांतका । देवाधीशा उमाकांता । प्रळवरुद्रा त्रिपुरांतका । शूलपाणी महाराजा ॥ १७८ ॥

Transliteration
Hey sakala daanava antakaa | Deva-adheeshaa Umaakaantaa | Pralaya-Rudraa Tripura -ntakaa | Shoola-paanee Mahaaraajaa ||

Ovee 179
हे शंकरनामाभिधानी । पंचवक्त्रा त्रिनयनी । भस्मधारणा उमारमणी । नरकपाळा विराजसी ॥ १७९ ॥

Transliteration
Hey Shankara naama abhi dhaanee | Pancha-Vaktraa trinayanee | Bhasma-dhaaranaa Umaa-ramanee | Naraka paalaa viraajasee ||

Ovee 180
ऐसें स्तुतीचें वाग्रत्न । दत्त अर्पितां माळा करोन । तेणें तोषोनि कामदहन । प्रत्यक्षपणें मिरवला ॥ १८० ॥

Transliteration
Aise stuteeche vaagratnu | Datta arpitaa maalaa karonu | Tene toshoni Kkaamadahanu | Pratyaksha pane miravalaa ||

Ovee 181
प्रत्यक्ष होतां उमाकांत । नयनीं यजिता झाला दत्त । मग आलिंगोनि प्रेमभरित । निकट आपण बैसला ॥ १८१ ॥

Transliteration
Pratyaksha hotaa Umaakaantu | Nayanee yajitaa jhaalaa Dattu | Maga aalingoni prema bharitu | Nikata aapana baisalaa ||

Ovee 182
योगक्षेमाची सकळ वार्ता । शिव पुसता झाला दत्ता । तेणेंही सांगोनि क्षेमवार्ता । शिवसुखा पूसिलें ॥ १८२ ॥

Transliteration
Yoga-kshemaachee sakala vaartaa | Shiva pusataa jhaalaa Dattaa | Tenenhee saangoni kshema-vaartaa | Shiva sukhaa poosile ||

Ovee 183
यापरी बोलता झाला दत्त । कीं बद्रिकाश्रमीं कानन बहुत । तरी महाराजा दृष्टी व्यक्त । माजी करा कृपाळुवा ॥ १८३ ॥

Transliteration
Yaaparee bolataa jhaalaa Dattu | Kee Badrikaa-Aashramee kaanana bahutu | Taree mahaaraajaa drishtee vyaktu | Maajee karaa kripaaluvaa ||

Ovee 184

मग अवश्य म्हणोनि उमारमण । उभयतां पाहूं चालले कानन । परी ही वासना दत्ताकारणें । मच्छिंद्रदैवें उद्भवली ॥ १८४ ॥

Transliteration

Maga avashya mhanoni Umaaramanu | Ubhayataa paahoo chaalale kaananu | Paree hee vaasanaa Dattaa kaarane | Machchindra-daive udbhavalee ||

Ovee 185

जैसा लाभ असतो पदरीं । तो सहज वळूनि येत घरीं । लघुशंके मूत्रधारीं । मांदुसघट लागतसे ॥ १८५ ॥

Transliteration

Jaisaa laabha asato padaree | Toh sahaja valuuni yeta gharee | Laghu shanke mootra-dhaaree | Maandusa-ghata laagatase ||

Ovee 186

कीं उष्णत्रासें मही चाली । आतुडे कल्पतरुची साउली । तेवीं दत्तवासना उद्भवली । मच्छिंद्रदैवप्रकरणीं ॥ १८६ ॥

Transliteration

Kee ushnatraase mahee chaalee | Aatude kalpataru chee saaulee | Tevee Datta-vaasanaa udbhavalee | Machchindra daiva prakaranee ||

Ovee 187

कीं याजव्रता टाकिल्या बाहेरी । हिरा ठेवोनि नेत मारी । तेवीं दत्तात्रेयवासनालहरी । उदेली मच्छिंद्रदैवानें ॥ १८७ ॥

Transliteration

Kee yaajavrataa taakilyaa baaheree | Hiraa thevoni neta gharee | Tevee Dattaatreya-vaasanaa-laharee | Udelee Machchindra-daivaane ||

Ovee 188

असो ऐशा लाभभावना । उभयतां रमती बद्रिकाश्रमा । नाना तरुप्लवंगमां । अपार चिन्हें पाहती ॥ १८८ ॥

Transliteration

Aso aishaa laabha-bhaavanaa | Ubhayataa ramatee Badrikaa-Aashramaa | Naanaa taru-plavangamaa | Apaara chinhe paahatee ||

Ovee 189

सुरतरु पोफळी । बकुळ चंपक कर्दळी । गुलछबु गुलाब केळी । नारळी सोनकेळी शोभल्या ॥ १८९ ॥

Transliteration

Surataru pophalee | Bakula champaka kardalee | Gulachabu gulaaba kelee | Naaralee sonakelee shobhalyaa ||

Ovee 190

कीं सहज पाषाण ढळितां महीसी । दैवें आतुडे हस्तपादांसी । तेवीं मच्छिंद्रदैवउद्देशी । दत्तवासना उद्भवली ॥ १९० ॥

Transliteration

Kee sahaja paashaana dhalitaa maheesee | Daive aatude hasta-paadaansee | Tevee Machchindra daiva uddeshee | Datta-vaasanaa udbhavalee ||

Ovee 191

ऐसे वर्णितां अपारतरु । तरी बद्रिकेचा फार शेजारु । कानना महा निकट मंदारु । मंदराचळ शोभला ॥ १९१ ॥

Transliteration

Aise varnitaa apaara taru | Taree Badrikechaa phaara shejaaru | Kaananaa mahaa nikata mandaaru | Mandaraachala shobhalaa ||

Ovee 192

तयावरोनि वर्षत तोयवर । मणिकर्णिके अपार नीर । ती भागीरथी उत्तमतीर । निजदृष्टीनें पाहिली ॥ १९२ ॥

Transliteration

Tayaa varoni varshata toyavaru | Manikarnike apaara neeru | Tee Bhaageerathee uttamateeru | Nija-drishteene paahilee ||

Ovee 193

मग तेथ ओघ धरोन । उभयतां करिते झाले गमन । असो मच्छिंद्राकारणें । निजदृष्टीं पाहातील ॥ १९३ ॥

Transliteration

Maga tetha ogha dharonu | Ubhayataa karite jhaale gamanu | Aso Machchindraa kaarane | Nija-drishtee paahaateela ||

Ovee 194

तेथे जी जी होईल वार्ता । श्रीगुरु ज्ञानें होय सांगता । निमित्तमात्र धुंडीसुता । ग्रंथामाजी मिरविलें ॥ १९४ ॥

Transliteration

Tethe jee jee hoeela vaartaa | Shreeguru jnyaane hoya saangataa | Nimitta-maatra Dhundeesutaa | Granthaa-maajee miravile ||

Ovee 195

धुंडीसुत नरहरिवंशीं । मालू वदे कवित्वासी । निमित्तमात्र नरहरिकृपेसी । तोचि बोलवी ज्ञानेश ॥ १९५ ॥

Transliteration

Dhundeesuta Narahari vamshee | Maaloo vade kavitvaasee | Nimitta-maatra Narahari-kripesee | Tochi bolavee Jnyaaneshu ||

Ovee 196

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । प्रथमोऽध्याय गोड हा ॥ १९६ ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha Kaavya kimayaa gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Prathama Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu | Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार प्रथमाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Prathama Sampurnah